मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: 9834138482



# पिंपरी-चिंचवडने मोडला विश्वविक्रम!

## आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतील ‘रेकॉर्ड ब्रेक’ सोहळा!

» पिंपरी | प्रतिनिधी

**रविवार, दि. ४ ऑक्टोबर २०२६ रोजी पिंपरी-चिंचवडच्या भूमीत ऐतिहासिक क्षण साकारला. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या भव्य ‘स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण’ला हजारो ढोलवादकांनी एकाचवेळी दिलेल्या विश्वविक्रमी मानवंदनेने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. हिंदुभूषण स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून आयोजित या सोहळ्यात ४ हजार ११२ ढोलांचे सलग पाच मिनिटे शिस्तबद्ध आणि एकसंध वादन करण्यात आले. आयोजकांच्या माहितीनुसार, या कामगिरीची गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्समध्ये नोंद झाली असून पिंपरी-चिंचवडच्या सांस्कृतिक इतिहासात नव्या विक्रमाची नोंद झाली आहे.**



यापूर्वी एकाचवेळी २ हजार ६५० ढोल वादनाचा विक्रम नोंदविण्यात आला होता. पिंपरी-चिंचवडमध्ये ४ हजार ११२ ढोलांच्या सामूहिक वादनातून हा विक्रम मोडीत काढण्यात आला. हजारो वादकांचा एकसंध ठेका, तालातील सातत्य, वेळेचे काटेकोर पालन आणि अचूक समन्वय यामुळे विश्वविक्रमाचा प्रयत्न यशस्वी ठरला.

हिंदुभूषण स्मारक ट्रस्ट, पिंपरी-चिंचवड आणि ढोल-ताशा महासंघ, महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने या भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्राच्या विविध भागांतून ढोल-ताशा पथके या उपक्रमासाठी पिंपरी-चिंचवडमध्ये दाखल झाली होती. मोशी, स्पाईन रोड आणि वाघेश्वर मंदिर परिसर, चऱ्होली अशा तीन ठिकाणी एकाचवेळी ढोल-ताशा वादनाची व्यवस्था करण्यात आली होती.

विश्वविक्रमाच्या प्रयत्नासाठी वादकांना तीन संधी उपलब्ध होत्या. एकाचवेळी सर्वाधिक ढोलांचे सलग पाच मिनिटे अखंड, शिस्तबद्ध आणि समन्वयपूर्ण वादन करणे हे या प्रयत्नाचे प्रमुख उद्दिष्ट होते. विविध पथकांमधील हजारो वादकांनी एकाच तालात वादन करत महाराष्ट्राच्या पारंपरिक रणवाद्य संस्कृतीचे भव्य दर्शन घडविले. ढोलांचा प्रत्येक ठेका शिवरायांच्या स्वराज्याची आठवण करून देत होता, तर ताशांचा निनाद धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्याचा जागर करत होता.

### तीन ठिकाणे... एकच ठेका!

**मोशी, स्पाईन रोड आणि वाघेश्वर मंदिर परिसर, चऱ्होली या तीन वेगवेगळ्या ठिकाणी हजारो ढोलवादक सज्ज झाले होते. अंतर वेगळे असले तरी ताल एकच, लक्ष्य एकच आणि भावना एकच होती. निर्धारित वेळेत सुरू झालेले सामूहिक वादन पाच मिनिटे अखंड सुरू राहिले आणि हजारो वादकांच्या समन्वयातून इतिहास घडला.**

वादनानंतर संपूर्ण परिसरात ‘हर हर महादेव’, ‘छत्रपती शिवाजी महाराज की जय’, ‘धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज की जय’, ‘भारत माता की जय’ आणि ‘वंदे मातरम्’ अशा घोषणांचा गजर झाला. हजारो नागरिक आणि वादकांनी एकमुखाने दिलेल्या जयघोषामुळे संपूर्ण परिसर भारावून गेला. ढोल-ताशांचा रणनाद आणि शिव-शंभूंचा जयघोष यांचा अभूतपूर्व संगम यावेळी अनुभवायला मिळाला.

कार्यक्रमाचे आणखी एक प्रमुख आकर्षण म्हणजे १११ शंखांचा सामूहिक शंखनाद. एकाचवेळी झालेल्या या शंखनादाने सोहळ्याला वेगळे धार्मिक आणि सांस्कृतिक अधिष्ठान प्राप्त झाले. ‘स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण’सोबतच परिसरात उभारण्यात येत असलेल्या १२८ मीटर उंच भगव्या धर्मध्वजाच्या गौरवार्थही विशेष मानवंदना अर्पण करण्यात आली. भगवा धर्मध्वज, शंखांचा निनाद, ढोल-ताशांचा गजर आणि शिव-शंभूंचा जयघोष यामुळे परिसरात उत्साहाचे आणि भक्तिभावाचे वातावरण निर्माण झाले होते.

सोहळ्याची सुरुवात स्वागत आणि प्रास्ताविकाने झाली. त्यानंतर ‘शिवशंभो गर्जना’ या शिवभक्तीपर सांगीतिक कार्यक्रमातून छत्रपती शिवाजी महाराज आणि धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या शौर्याचा, त्यागाचा आणि राष्ट्रनिष्ठ विचारांचा जागर करण्यात आला. मर्दानी खेळांच्या सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली.

# मोहननगरमधील सर्व्हिस सेंटरवर डल्ला; EV बॅटऱ्या आणि मोटर्स चोरीला

» पिंपरी | प्रतिनिधी

**चिंचवडच्या मोहननगर परिसरातील एका सर्व्हिस सेंटरमधून तब्बल ९ लाख ८६ हजार रुपये किमतीच्या ईव्ही दुचाकींच्या बॅटऱ्या आणि इलेक्ट्रिक मोटर्स चोरीला गेल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी एका विधीसंघर्षग्रस्त बालकासह चिखलीतील एका भंगार व्यावसायिकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



याप्रकरणी स्वाती मनीष मोहिते (वय ४६, रा. भक्ती शक्ती अपार्टमेंट, चिंचवड) यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, डिसेंबर २०२५ ते १६ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजेपर्यंत मोहननगर, चिंचवड येथील जय मातादी सर्व्हिस सेंटरमध्ये ही घटना घडली.

फिर्यादी यांच्या सर्व्हिस सेंटरमध्ये ट्रेनिंगच्या निमित्ताने काम करणाऱ्या एका विधीसंघर्षग्रस्त बालकाने ईव्ही टुव्हिलरच्या बॅटऱ्या आणि ईव्ही मोटर्स चोरल्याचा आरोप आहे. चोरी केलेल्या या साहित्याची एकूण किंमत सुमारे ९ लाख ८६ हजार रुपये असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. चोरीनंतर संबंधित माल चिखली परिसरातील एका भंगार व्यावसायिकाला विकण्यात आल्याचेही प्राथमिक तपासातून समोर आले आहे.

त्यामुळे संबंधित भंगार व्यावसायिकाविरोधातही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणातील दोन्ही संशयितांना अद्याप अटक करण्यात आलेली नाही. पोलिसांनी गुन्हा नोंदवून चोरीचा माल नेमका कुठे गेला, त्याची पुढे विल्हेवाट लावण्यात आली का आणि या प्रकरणात आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास सुरू केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पिंपरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अतिग्रे करत आहेत.

# अहिल्यादेवींच्या विचारांचा वारसा जपावा – गोपीचंद पडळकर

## पिंपळे गुरव येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा; भव्य स्मारक उभारण्याची अपेक्षा

» पिंपरी | प्रतिनिधी

**पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी लोककल्याण, न्याय आणि समाजहिताचा आदर्श निर्माण केला. त्यांच्या कार्याची उंची मोजता येणार नाही. त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीने जपत समाजाच्या प्रगतीसाठी योगदान द्यावे, असे आवाहन भाजपा आमदार गोपीचंद पडळकर यांनी केले. अहिल्यादेवी होळकर यांच्या ऐतिहासिक आणि सामाजिक कार्याची व्यापकता लक्षात घेता पिंपरी-चिंचवड शहरात त्यांचे भव्य स्मारक उभारण्यात यावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.**



अहिल्यादेवी सेवा संघ, सांगवी-पिंपळे गुरव परिसर यांच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुण्यतिथी आणि विद्यार्थी गुणगौरव समारंभ नवी सांगवी येथील निळूभाऊ फुले नाट्यगृहात आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यात समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. कार्यक्रमास राज्यसभा खासदार राम वडकुते, भाजपा आमदार गोपीचंद पडळकर, आमदार शंकर जगताप, माजी महापौर उषा ढोरे, शकुंतला धराडे, शशिकांत कदम, ज्ञानेश्वर जगताप, पल्लवी जगताप, तृप्ती कांबळे, रविना आंगोळकर, संघाचे संस्थापक अध्यक्ष सूर्यकांत गोफणे, माजी अध्यक्ष अभिमन्यु गाडेकर, अजय दूधभाते, अध्यक्ष सचिन सरक, उपाध्यक्ष प्रा. शरद गलांडे, डॉ. अतुल होळकर, कार्याध्यक्ष रमेश गाढवे, सचिव रामेश्वर हराळे, सहसचिव लक्ष्मण शिंदे, खजिनदार डॉ. दिनेश गाडेकर, सहखजिनदार सूरज गोटके, प्रसिद्धीप्रमुख महादेव मासाळ यांच्यासह पदाधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार पडळकर म्हणाले की, अहिल्यादेवींनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत अनेक संकटांवर मात करत लोककल्याणाचे कार्य केले. न्यायप्रिय राज्यकारभार, धार्मिक आणि सामाजिक कार्य, समाजहिताला प्राधान्य देणारी दृष्टी आणि सामान्य जनतेप्रती असलेली बांधिलकी यामुळे त्यांचे कार्य आजही प्रेरणादायी आहे. होळकर घराण्याचे पुणे जिल्ह्याशी ऐतिहासिक नाते असून, सुभेदार मल्हारराव होळकर यांनी वाफगाव येथे भुईकोट किल्ला उभारला. काशी विश्वेश्वर मंदिरात अहिल्यादेवींचा पुतळा असणे ही अभिमानाची बाब असल्याचेही त्यांनी सांगितले. धनगर समाजाच्या प्रश्नांकडे लक्ष वेधताना पडळकर म्हणाले की, समाजाची लोकसंख्या मोठी असतानाही अपेक्षित प्रमाणात राजकीय प्रतिनिधित्व मिळत नाही, ही गंभीर बाब आहे. समाजाने आपले वेगळेपण, संस्कृती, परंपरा आणि ऐतिहासिक मुळे जपली पाहिजेत.

नव्या पिढीने आधुनिक शिक्षण आणि प्रगतीकडे वाटचाल करताना स्वतःची सामाजिक व सांस्कृतिक ओळख जपणे आवश्यक आहे. धनगर समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली. यासंदर्भातील याचिका सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असल्याचेही त्यांनी नमूद केले. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील 'मिसिंग लिंक'ला शिंग्रोबा धनगर यांचे नाव द्यावे, तसेच मुंबईतील चर्चगेट रेल्वे स्थानकाला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव द्यावे, अशी मागणीही पडळकर यांनी केली. समाजाच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण व्यक्तिमत्त्वांना योग्य सन्मान मिळणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना पडळकर म्हणाले, "स्वतःला कधीही कमी समजू नका. मोठी स्वप्ने पाहा; मात्र ती पूर्ण करण्यासाठी कृती, सातत्य आणि कठोर मेहनत आवश्यक आहे.

जीवनात यशस्वी होण्याबरोबरच चांगला माणूस होणेही तितकेच महत्त्वाचे आहे." राज्यसभा खासदार राम वडकुते म्हणाले की, समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सार्वजनिक सन्मान करणे ही प्रेरणादायी बाब आहे. अशा गुणगौरवामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि इतर विद्यार्थ्यांनाही पुढे जाण्याची प्रेरणा मिळते. समाजाची सुमारे दीड कोटी लोकसंख्या असताना अपेक्षित प्रगती का साधता आली नाही, याचे आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे.

केवळ मोठी स्वप्ने पाहून चालणार नाही, तर त्या स्वप्नांच्या पूर्ततेसाठी नियोजनबद्ध कृती आणि सातत्यपूर्ण प्रयत्न आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. भाजपा आमदार शंकर जगताप म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या पाठीवर पडणारी कौतुकाची थाप त्यांच्या पुढील वाटचालीसाठी मोठी प्रेरणा ठरते. अहिल्याबाई होळकर यांच्या कार्याची उंची मोजता येणार नाही. मुलांना केवळ अभ्यासाचे महत्त्व सांगून चालणार नाही, तर चांगले आणि वाईट यातील फरक ओळखण्याची शिकवण देणेही आवश्यक आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये रंगणार टी-२०चा थरार; क्रिकेट क्लब सज्ज!

» पिंपरी | प्रतिनिधी

**पिंपरी-चिंचवड शहरातील क्रिकेट संस्कृतीला नवी उंची देण्यासाठी आणि स्थानिक गुणवंत खेळाडूंना स्पर्धात्मक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी पिंपरी-चिंचवड शहर क्रिकेट असोसिएशनतर्फे 'पिंपरी-चिंचवड करंडक' आंतर-क्लब ओपन टी-२० क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा २० ऑक्टोबर २०२६ पासून हिंजवडी येथील फोर स्टार क्रिकेट मैदानावर रंगणार आहे.**

शहरातील विविध क्रिकेट क्लब या स्पर्धेत सहभागी होणार असून, टी-२०च्या वेगवान आणि रोमांचक स्वरूपातून स्थानिक क्रिकेटपटूंना आपली फलंदाजी, गोलंदाजी, क्षेत्ररक्षण आणि अष्टपैलू कौशल्य सिद्ध करण्याची संधी मिळणार आहे.

विशेष म्हणजे या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना आगामी पिंपरी-चिंचवड टी-२० प्रीमियर लीग (PCPL) मध्ये खेळण्याची संधी उपलब्ध होणार असल्याने खेळाडूंमध्ये मोठा उत्साह निर्माण झाला आहे. स्पर्धेतील विजेत्या संघाला रोख २५ हजार रुपये आणि चषक प्रदान करण्यात येणार आहे.

उपविजेत्या संघाला १५ हजार रुपये आणि चषक, तर तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या संघाला ५ हजार रुपये आणि चषक देऊन गौरविण्यात येणार आहे. सांघिक पारितोषिकांसोबतच उत्कृष्ट फलंदाज, उत्कृष्ट गोलंदाज, उत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू आणि उत्कृष्ट क्षेत्ररक्षक अशा विविध वैयक्तिक पुरस्कारांमधून चमकदार कामगिरी करणाऱ्या खेळाडूंनाही सन्मानित करण्यात येणार आहे.

पिंपरी-चिंचवड शहर क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष जगदीश शेट्टी यांनी सांगितले की, या स्पर्धेत पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील क्रिकेट क्लब तसेच त्याच कार्यक्षेत्रातील खेळाडूंनाच सहभागी होता येणार आहे. स्थानिक क्रिकेटपटूंना अधिकाधिक संधी उपलब्ध करून देणे आणि त्यांच्यातील गुणवंत खेळाडूंना योग्य व्यासपीठ देऊन पुढे आणणे हा स्पर्धेचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शहरात क्रिकेट खेळणाऱ्या अनेक तरुणांमध्ये गुणवत्ता असूनही त्यांना सातत्याने दर्जेदार आणि स्पर्धात्मक सामने खेळण्याची संधी मिळत नाही. 'पिंपरी-चिंचवड करंडक'च्या माध्यमातून अशा खेळाडूंना आपली क्षमता सिद्ध करण्याची मोठी संधी मिळणार असून, स्थानिक क्रिकेटमधून नव्या प्रतिभावंत खेळाडूंची फळी तयार करण्याचा असोसिएशनचा प्रयत्न आहे. असोसिएशनचे सचिव राजू कोतवाल म्हणाले की, पिंपरी-चिंचवड शहरात क्रिकेटचा सर्वांगीण विकास व्हावा आणि स्थानिक खेळाडूंना सातत्याने स्पर्धात्मक सामने खेळण्याची संधी मिळावी यासाठी असोसिएशन प्रयत्नशील आहे. या स्पर्धेमुळे क्रिकेटपटूंना स्वतःची गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी प्रभावी व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. त्याचबरोबर आगामी PCPL साठी प्रतिभावंत आणि सातत्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या खेळाडूंची निवड करण्यासही या स्पर्धेचा मोठा फायदा होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

स्पर्धेसाठी प्रवेश नोंदणीची अंतिम तारीख १२ ऑक्टोबर २०२६ निश्चित करण्यात आली आहे. इच्छुक क्रिकेट क्लबांनी अंतिम तारखेपूर्वी आपली नोंदणी पूर्ण करावी, असे आवाहन पिंपरी-चिंचवड शहर क्रिकेट असोसिएशनच्या वतीने करण्यात आले आहे. स्पर्धेबाबत अधिक माहितीसाठी राजू कोतवाल यांच्याशी ९९२२५०२४१४ किंवा सुशील जाधव यांच्याशी ९९२३२३१२१८ या क्रमांकावर संपर्क साधता येणार आहे.

# ‘वेस्ट टू एनर्जी’ ठप्प; ठेकेदाराला रोज 50 हजारांचा दणका!

## चार महिन्यांपासून प्रकल्प बंद; १.२० लाख टन कचरा साचला, कचरा कोंडी कायम

**» पुणे | प्रतिनिधी**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या मोशी कचरा डेपोतील ‘वेस्ट टू एनर्जी’ प्रकल्पाला चार महिन्यांपासून कुलूप लागले असून, ठेकेदाराच्या दिरंगाईचा थेट फटका संपूर्ण शहराला बसत आहे. धुराड्याच्या चिमणीचे काम मुदतीत पूर्ण न केल्याने संबंधित ठेकेदार ॲन्टोनी लारा रिन्युएबल एनर्जी प्रा. लि. कंपनीला १ ऑक्टोबरपासून प्रतिदिन ५० हजार रुपयांचा दंड आकारण्यास सुरुवात करण्यात आली आहे. चिमणीचे काम पूर्ण करून प्रकल्प प्रत्यक्षात सुरू होईपर्यंत हा दंड सुरू राहणार आहे.**



मोशी कचरा डेपोमध्ये डीबीओटी तत्त्वावर जुलै २०२३ पासून ‘वेस्ट टू एनर्जी’ प्रकल्प सुरू करण्यात आला होता. या प्रकल्पात दररोज सुमारे ७०० टन सुका कचरा जाळून त्यातून १४ मेगावॅट वीज निर्मिती केली जात होती. मात्र, कचरा जाळताना निर्माण होणाऱ्या धुरामुळे वायू प्रदूषणाचा प्रश्न निर्माण झाला होता. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने यासंदर्भात प्रकल्पाला कारणे दाखवा नोटीसही बजावली होती.

त्यानंतर ५ जून २०२६ रोजी प्रकल्पातील धुराड्याची चिमणी पाडण्यात आली. तेव्हापासून वेस्ट टू एनर्जी प्रकल्प पूर्णपणे बंद आहे. त्यातच ८ जुलै रोजी कंपनीची अनधिकृत प्रशासकीय इमारत कोसळून ९ कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला, तर १२ कर्मचारी जखमी झाले. या घटनेनंतर मोशी कचरा डेपोमध्ये कचरा वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या प्रवेशावरही परिणाम झाला आणि शहरातील कचरा व्यवस्थापनाची घडी विस्कटली. प्रकल्प बंद असल्याने पिंपरी-चिंचवडमध्ये कचरा कोंडीची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. अनेक भागांमध्ये कचरा उचलण्यास विलंब होत असून, साचलेल्या कचऱ्यामुळे नागरिक त्रस्त आहेत.

सर्वच राजकीय पक्षांच्या नगरसेवकांकडून कचऱ्याची समस्या तातडीने सोडवण्याची मागणी होत आहे. महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी वेस्ट टू एनर्जी प्रकल्प तातडीने सुरू करण्याचे आदेश ठेकेदाराला दिले होते. त्यानुसार ठेकेदाराने ३० सप्टेंबरपर्यंत चिमणीचे काम पूर्ण करून १ ऑक्टोबरपासून प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरू करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, निर्धारित मुदत उलटूनही चिमणीचे काम पूर्ण झाले नाही. ठेकेदाराच्या या दिरंगाईवर अखेर महापालिका प्रशासनाने कठोर भूमिका घेतली.

आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांच्या आदेशानुसार १ ऑक्टोबरपासून कंपनीला प्रतिदिन ५० हजार रुपये दंड आकारण्यास सुरुवात करण्यात आली आहे. महापालिकेच्या पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडून हा दंड वसूल केला जात आहे. वेस्ट टू एनर्जी प्रकल्प बंद असल्याने मोशी कचरा डेपोतील दररोज सुमारे एक हजार टन कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची प्रक्रिया विस्कळीत झाली आहे. मागील चार महिन्यांत अंदाजे १ लाख २० हजार टन कचऱ्याची भर पडली असून, डेपो परिसरात कचऱ्याचे मोठे ढीग निर्माण झाले आहेत.

याचबरोबर दररोज होणारी १४ मेगावॅट वीज निर्मितीही ठप्प आहे. त्यामुळे महापालिकेला पर्यायी वीज खरेदीवर अधिक खर्च करावा लागत आहे. एकीकडे कचऱ्याची विल्हेवाट बंद, दुसरीकडे वीज निर्मिती ठप्प आणि तिसरीकडे शहरात साचणाऱ्या कचऱ्यामुळे नागरिकांचा संताप वाढत असल्याचे चित्र आहे. प्रकल्पातील चिमणीचे काम पूर्ण होईपर्यंत ही परिस्थिती कायम राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे आता प्रशासनाचा दंडात्मक बडगा ठेकेदाराच्या कामाला गती देतो का, याकडे शहराचे लक्ष लागले आहे.

# चिंचवड रेल्वे क्वार्टर्स की सापांचे आश्रयस्थान?; रहिवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न

**» पुणे | प्रतिनिधी**

**रेल्वे प्रवाशांना अहोरात्र सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी असलेल्या चिंचवड रेल्वे स्टेशन परिसरातील क्वार्टर्सची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. मूलभूत सुविधा, स्वच्छता, सुरक्षितता आणि नियमित देखभाल यांचा पूर्णपणे बोजवारा उडाल्याचे चित्र येथे दिसून येत आहे. परिसरात वाढलेली झाडाझुडपे, गवत, साचलेला कचरा, पाण्याचा अपुरा निचरा, गंजलेले लोखंडी साहित्य, राडारोडा आणि कंत्राटदारांची अवजड वाहने यामुळे रहिवाशांचे दैनंदिन जीवन अक्षरशः धोक्यात आले आहे.**







क्वार्टर्स परिसरात नियमित साफसफाईसाठी कंत्राटी यंत्रणा असतानाही प्रत्यक्षात स्वच्छतेकडे दुर्लक्ष होत असल्याची रहिवाशांची तक्रार आहे. अनेक ठिकाणी गवत आणि झुडपे मोठ्या प्रमाणात वाढली असून, त्यातून सापांचा वावर वाढल्याचे स्थानिक सांगतात. काही रहिवाशांच्या म्हणण्यानुसार, जवळपास दररोज साप दिसत असून, या भीतीमुळे लहान मुलांना घराबाहेर खेळू देणेही कठीण झाले आहे.

या परिस्थितीची गंभीरता अधोरेखित करणारी धक्कादायक घटना देखील येथे घडल्याचे रहिवाशांनी सांगितले. एका शाळकरी मुलाच्या दप्तरात साप आढळल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. या घटनेनंतर पालकांमध्ये मोठी चिंता असून, मुलांना शाळेत पाठवताना आणि घरी खेळू देताना सतत काळजी घ्यावी लागत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. रेल्वे क्वार्टर्सच्या परिसरातील साफसफाईसाठी स्वतंत्र कंत्राटदार नेमलेला असतानाही गवत, झाडाझुडपे आणि कचरा वेळेवर हटविला जात नसल्याने अस्वच्छता वाढत आहे.

त्यामुळे कंत्राटदाराचे काम नियमितपणे तपासले जाते का, कामात हलगर्जीपणा झाल्यास कारवाई केली जाते का आणि रहिवाशांच्या तक्रारींची दखल कोण घेणार, असे प्रश्न आता उपस्थित होत आहेत. क्वार्टर्स परिसरातच कंत्राटदारांची अवजड वाहने, पोकलेन आणि बांधकाम साहित्य ठेवण्यात आल्याने आणखी एक गंभीर सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि पादचाऱ्यांची सतत वर्दळ असलेल्या जागेत अशा प्रकारे अवजड वाहने उभी करण्यास परवानगी कोणी दिली, याचा खुलासा करण्याची मागणी रहिवाशांकडून होत आहे. रहिवासी वापरत असलेल्या जागेवरच यंत्रसामग्री आणि वाहने उभी असल्याने अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. विशेषतः लहान मुले या परिसरात खेळत असल्याने त्यांच्या सुरक्षेबाबत पालकांमध्ये भीती वाढली आहे. अवजड वाहने आणि पोकलेनसाठी स्वतंत्र जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे का, याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत.

क्वार्टर्समधील आणखी एक गंभीर समस्या म्हणजे पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा होत नसणे. पावसाळ्यात पाणी थेट घरांच्या दिशेने वाहत येते आणि काही ठिकाणी घरात शिरते, अशी तक्रार रहिवाशांनी केली आहे. यामुळे घरातील साहित्याचे नुकसान तर होतेच, परंतु पाणी साचल्याने डासांचा प्रादुर्भाव आणि साथीच्या आजारांचा धोका वाढण्याची शक्यता आहे. पावसाच्या पाण्यासाठी सक्षम आणि कायमस्वरूपी ड्रेनेज व्यवस्था नसल्याने वर्षानुवर्षे ही समस्या कायम असल्याचेही स्थानिक सांगतात. प्रत्येक पावसाळ्यात तात्पुरत्या उपाययोजना करण्याऐवजी रेल्वे प्रशासनाने कायमस्वरूपी निचरा व्यवस्था उभारावी, अशी मागणी रहिवाशांकडून करण्यात येत आहे. रेल्वे क्वार्टर्सच्या अनेक भागात गंजलेले लोखंडी साहित्य, वापरात नसलेले भंगार आणि बांधकामाचा राडारोडा पडून आहे. रहिवाशांच्या वर्दळीच्या जागेतच हे साहित्य पडून असल्याने अपघाताचा धोका निर्माण झाला आहे.

# पुणे पदवीधर मतदारसंघात भाजपचा मोठा डाव!

## नोटीसधारकांना तहसीलच्या फेऱ्या नाहीत; BLO घरी येऊन कागदपत्रे स्वीकारणार

**>> पिंपरी | प्रतिनिधी**

**आगामी विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने पुणे पदवीधर मतदारसंघासाठी शिक्षण क्षेत्रातील परिचित चेहरा असलेल्या डॉ. स्मिता योगेश जाधव यांच्यावर विश्वास दाखवत उमेदवारी जाहीर केली आहे. उमेदवारीच्या घोषणेनंतर पुण्यातील भाजप शहर कार्यालयात डॉ. जाधव यांचा पक्षप्रवेश सोहळा उत्साहात पार पडला. महाराष्ट्र भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या प्रवेशामुळे पुणे पदवीधर मतदारसंघातील निवडणूक लढत अधिक चुरशीची होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.**



भाजपने आगामी विधान परिषद निवडणुकांसाठी तीन उमेदवारांची घोषणा केली असून, त्यात पुणे पदवीधर मतदारसंघातून डॉ. स्मिता योगेश जाधव यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

शिक्षण, तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन क्षेत्रातील त्यांचा अनुभव लक्षात घेऊन पक्षाने त्यांना मैदानात उतरविल्याचे मानले जात आहे. पक्षप्रवेशावेळी भाजपचे विविध नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. स्मिता योगेश जाधव या उच्च विद्याविभूषित असून त्यांनी बी.ई. (कॉम्प्युटर्स), एमबीए (फायनान्शियल मॅनेजमेंट) आणि पीएच.डी. (एज्युकेशन) अशी उच्च शैक्षणिक पात्रता प्राप्त केली आहे. तंत्रज्ञान, अर्थव्यवस्था आणि शिक्षण या तिन्ही क्षेत्रांचा अभ्यास असल्याने शैक्षणिक प्रशासन, संस्थात्मक व्यवस्थापन आणि धोरणनिर्मिती या क्षेत्रांत त्यांना व्यापक अनुभव आहे. शिक्षण क्षेत्रात नवकल्पना, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, संस्थात्मक विकास आणि धोरणात्मक नेतृत्व यांचा मेळ घालत त्यांनी विविध स्तरांवर काम केले आहे. सध्या त्या पिंपरी येथील डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू म्हणून कार्यरत आहेत. तसेच, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ सोसायटीच्या सचिवपदाची जबाबदारीही त्या सांभाळत आहेत.

शैक्षणिक संस्थांचे प्रशासन, विद्यार्थ्यांच्या गरजा, उच्च शिक्षणातील बदलते प्रवाह, कौशल्याधारित शिक्षण आणि नव्या शैक्षणिक धोरणांची अंमलबजावणी या विषयांवर त्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव आहे. त्यामुळे पदवीधर मतदारसंघातील शिक्षक, प्राध्यापक, व्यावसायिक आणि उच्चशिक्षित मतदारांशी थेट संवाद साधण्याचा फायदा भाजपला होऊ शकतो, अशी चर्चा राजकीय वर्तुळात आहे. डॉ. जाधव यांच्या पक्षप्रवेशामुळे भाजपने पुणे पदवीधर मतदारसंघात शिक्षण क्षेत्राशी थेट जोडलेला आणि प्रशासकीय अनुभव असलेला चेहरा पुढे केल्याचे स्पष्ट झाले आहे. पारंपरिक राजकीय चेहऱ्यांऐवजी शिक्षण क्षेत्रातून उमेदवार देत भाजपने या निवडणुकीत वेगळी रणनीती आखल्याचेही बोलले जात आहे.

प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत झालेला पक्षप्रवेश हा केवळ औपचारिक प्रवेश न राहता आगामी निवडणुकीच्या प्रचाराचा प्रारंभ मानला जात आहे. पुणे पदवीधर मतदारसंघ हा राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा मानला जात असल्याने येत्या काळात या मतदारसंघात प्रचाराची रणधुमाळी तीव्र होण्याची शक्यता आहे. डॉ. स्मिता जाधव यांच्या उमेदवारीमुळे शिक्षण क्षेत्रातील प्रश्न, उच्च शिक्षणातील गुणवत्ता, रोजगाराभिमुख अभ्यासक्रम, तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि पदवीधरांच्या अपेक्षा हे मुद्दे निवडणुकीच्या केंद्रस्थानी येण्याची शक्यता आहे. भाजपने उच्चशिक्षित आणि संस्थात्मक नेतृत्वाचा अनुभव असलेला चेहरा मैदानात उतरवल्याने पुणे पदवीधर मतदारसंघातील समीकरणे बदलणार का, याकडे आता राजकीय व शैक्षणिक क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

# ओतूरमध्ये चोरट्यांचा धुमाकूळ; बंद घरातून लाखोंचा ऐवज लंपास

**>> पुणे | प्रतिनिधी**

**ओतूर येथे डॉक्टर दाम्पत्याच्या बंद घरावर चोरट्यांनी डल्ला मारत लाखो रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. घर दोन दिवस बंद असल्याची संधी साधून चोरट्यांनी मुख्य दरवाजाचा कडी-कोयंडा तोडत घरात प्रवेश केला आणि कपाटांची उचकापाचक करून सोन्या-चांदीचे दागिने तसेच रोख रक्कम घेऊन पोबारा केला. भरवस्तीत घडलेल्या या धाडसी घरफोडीमुळे परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.**



मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित डॉक्टर दाम्पत्य काही कामानिमित्त दोन दिवसांसाठी पुण्याला गेले होते. घर बंद असल्याची माहिती किंवा संधी साधत चोरट्यांनी घराच्या मुख्य दरवाजाची कडी तोडली. त्यानंतर घरात प्रवेश करून कपाटे आणि इतर साहित्याची उचकापाचक केली. कपाटात ठेवलेले सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असा लाखो रुपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केल्याची प्राथमिक माहिती आहे. डॉक्टर दाम्पत्य रविवारी, दि. ४ रोजी रात्री सुमारे ९ वाजता घरी परतल्यानंतर चोरीचा प्रकार त्यांच्या निदर्शनास आला. मुख्य दरवाजाची कडी तुटलेली होती, तर घरातील कपाटे फोडून साहित्य अस्ताव्यस्त करण्यात आले होते. घरातील मौल्यवान वस्तू गायब असल्याचे लक्षात येताच त्यांनी तातडीने ओतूर पोलिसांशी संपर्क साधला. घटनेची माहिती मिळताच ओतूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली.

घरफोडी नेमकी कोणत्या वेळेत झाली, चोरटे किती जण होते आणि त्यांनी परिसराची पूर्वी रेकी केली होती का, याचा तपास आता सुरू करण्यात आला आहे.

पोलिसांकडून परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले जात असून संशयितांच्या हालचालींची माहिती गोळा केली जात आहे. तसेच तपासासाठी डॉगस्कॉडची मदत घेण्याचीही तयारी करण्यात येत असल्याची माहिती आहे.

चोरीला गेलेल्या ऐवजाची अचूक किंमत आणि तपशीलही पडताळला जात आहे. भरवस्तीत बंद घर हेरून चोरट्यांनी इतक्या धाडसाने घरफोडी केल्याने ओतूरमधील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. विशेषतः बंद घरे लक्ष्य करणारी टोळी परिसरात सक्रिय आहे का, याबाबत नागरिकांमध्ये चर्चा सुरू झाली आहे. स्थानिक नागरिकांनी या घटनेबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली आहे. बंद घरे हेरून चोरी करणाऱ्या आरोपींचा पोलिसांनी तातडीने शोध घ्यावा, तसेच रात्रीच्या वेळी पोलिस गस्त वाढवावी, अशी मागणी होत आहे.

भरवस्तीत घडलेल्या या चोरीच्या घटनेमुळे ओतूर परिसरात भीतीचे वातावरण असून, चोरट्यांचा लवकर छडा लावण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे. सहाय्यक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.